# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## ऑगस्ट २०२५

# ई वार्ता




LEGEND

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७९८/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

ऑगस्ट २०२५

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे उद्यानविद्या विभागांतर्गत २९ व्या वार्षिक कार्यशाळा बैठकीचे आयोजन






**दि. २२ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे उद्यानविद्या विभागांतर्गत अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके संशोधन योजनेची २९ वी वार्षिक कार्यशाळा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (उद्यानविद्या विज्ञान) डॉ. संजय कुमार सिंग हे उपस्थित होते. याप्रसंगी सन्माननीय अतिथी म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे फळे आणि लागवड पिके योजनेचे सहाय्यक महासंचालक डॉ. व्ही.बी. पटेल उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर भा.कृ.अ.प.–सी.आय.ए.एच, बिकानेरचे प्रकल्प समन्वयक डॉ. जगदीश राणे, राहुरी कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. टी.ए. मोरे, कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील व कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्पाचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. एस.पी. गायकवाड उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख म्हणाले की कोरडवाहू फळपिकांच्या उत्पादनांमध्ये भारत जगामध्ये दुसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्राचे १८ लाख हेक्टर क्षेत्र कोरडवाहू फळपिकांखाली येते. कोरडवाहू फळपिके कमी पाणी तसेच अती तापमानात तग धरतात. या पिकांमध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मामुळे बाजारपेठेत मोठी मागणी असते. कोरडवाहू क्षेत्र असणाऱ्या तसेच कमी पाण्याची उपलब्धता असणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी कोरडवाहू फळपिकांचे मोठे योगदान आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. संजय कुमार सिंग म्हणाले की संपूर्ण भारतासाठी कोरडवाहू फळांच्या संशोधनाचा आराखडा ठरविणे हा या बैठकीचा हेतू आहे. कोरडवाहू फळपिकांमध्ये कोणत्याही प्रतिकुल परिस्थितीत तग धरुन राहण्याची क्षमता असते. हलक्या प्रतिची तसेच कमी पाण्याची उपलब्धता असणाऱ्या कोरडवाहू जमीनीत कोरडवाहू फळपिके चांगले उत्पन्न देतात, ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. कोरडवाहू फळपिकांकडे औषधी गुणधर्म तसेच हर्बल दृष्टीकोनातून अधिक लक्ष देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. डॉ. विठ्ठल शिर्के यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जगदीश राणे यांनी सन २०२४–२५ या वर्षाच्या प्रकल्प समन्वयकांच्या अहवालाचे सादरीकरण केले.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते भारतातील विविध संशोधन केंद्रांनी तयार केलेल्या पुस्तीकांचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. बी.टी. पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी भा.कृ.अ.प.–आय.आय.एच.आर., बंगळुरूचे प्रकल्प समन्वयक डॉ. प्रकाश पाटील, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पी.सी. त्रिपाठी, परभणी कृषि विद्यापीठाचे माजी संशोधन संचालक डॉ. डी.पी. वासकर, नियंत्रक सदाशीव पाटील, गणेशखिंड येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर, देशाच्या ११ राज्यातून ८० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ, सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी मानले.

## पदव्युत्तर महाविद्यालयांतर्गत आंतरमहाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**दि. २१ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये पदव्युत्तर महाविद्यालयांतर्गत आंतरमहाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धा–२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. ज्ञानेश्वर खुरांगे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता





डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, नियंत्रक सदाशिव पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यापीठ विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सुनील भणगे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष तथा वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, विद्यार्थी कल्याण अधिकारी (पम) डॉ. विजय पाटील, विद्यापीठ क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, क्रीडा अधिकारी (पम) डॉ. बाबासाहेब भिंगारदे, सहाय्यक कुलसचिव (पम) गोविंद तागडे व जिल्हा क्रीडा असोसिएशनचे सहसचिव विजय मिस्कीन उपस्थित होते.

याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की आयुष्यामध्ये एकातरी खेळात प्राविण्य मिळविणे गरजेचे आहे. खेळामध्ये प्राविण्य मिळवायचे असेल तर सराव, सातत्य, जिद्द व चिकाटी असणे गरजेचे आहे. एखाद्या खेळात प्राविण्य मिळविले तर आपला आत्मविश्वास वाढतो. शरीर सुदृढ होते आणि शारिरीक व मानसिक आरोग्य सुधारते. याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की या कबड्डी स्पर्धेत सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करावे, सांघिक भावना जोपासावी व उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन करावे. प्रमुख मार्गदर्शन करतांना श्री. ज्ञानेश्वर खुरांगे म्हणाले की शरीर सुदृढ असेल तर आपण कोणत्याही क्षेत्रात प्राविण्य मिळवू शकतो. सुदृढ शरीरासाठी आयुष्यात कोणत्याही एका खेळामध्ये प्राविण्य मिळवा. क्रीडा क्षेत्र असे आहे की ज्यात तुम्हाला नावलौकिक मिळविता येतो. एखाद्या क्रीडा प्रकारात आपण प्राविण्य मिळवून राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळता येते. यामुळे आपल्याला शासनाकडून भरघोस बक्षीसे मिळतात व सरकारी नोकरी देखील मिळते. खेळामध्ये प्राविण्य मिळविण्यासाठी अधिक परिश्रम आणि कठोर सरावाशिवाय पर्याय नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. विलास यांनी करुन दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. बाबासाहेब भिंगारदे यांनी मानले. पदव्युत्तर महाविद्यालयाचा विद्यार्थी रोहित लांडगे याने विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ दिली. कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, पंच, विविध संघाचे संघ व्यवस्थापक, विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

## पाडेगाव ऊस संशोधन केंद्राला महाराष्ट्र शासनाकडून ४१ कोटींच्या भरीव निधीस प्रशासकीय मान्यता

**दि. २६ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राला नवीन प्रशासकीय इमारत, शेतकरी प्रशिक्षण केंद्र, अतिथीगृह आणि कर्मचारी निवासस्थानाकरिता ४० कोटी ९१ लाख ११ हजार रुपये एवढ्या भरीव निधीस शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राच्या या यशामागे महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री व सध्याचे क्रीडामंत्री मा.ना. ॲड. माणिकराव कोकाटे, मंत्री कृषि मा.ना. श्री. दत्तात्रय भरणे यांचे सहकार्य व विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, कृषिच्या उपसचिव श्रीमती प्रतिभा पाटील यांचे सहकार्य, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे आणि विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके यांनी बळकटीकरण प्रस्ताव सादरीकरणासाठी परिश्रम घेतले.

माजी कृषिमंत्री व सध्याचे क्रीडामंत्री मा.ना. ॲड. माणिकराव कोकाटे यांनी पाडेगाव ऊस संशोधन केंद्रास भेट दिली होती. यावेळी मंत्री मा.ना. ॲड. माणिकराव कोकाटे यांनी या संशोधन केंद्रास आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा देण्यासाठी तत्वतः मान्यता दिली होती. याप्रसंगी मंत्री ना. ॲड. कोकाटे यांनी पाडेगाव ऊस संशोधन केंद्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रयोगशाळा तसेच प्रक्षेत्रावर सोयी सुविधा, येणाऱ्या शेतकऱ्यांची राहण्याची व्यवस्था, प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्र आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले होते.







त्यांच्या कार्यकाळात हा प्रस्ताव सादर होऊन मान्यता मिळाली व कृषि मंत्री ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्या कार्यकाळात निधी मंजूर झाला. या केंद्राने राज्यातील शेतकऱ्यांसाठी व साखर उद्योगांकरिता अधिक ऊस व साखर उत्पन्न देणारे उसाचे १७ वाण प्रसारित केलेले असून आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ऊस लागवड तंत्रज्ञानासंबंधीच्या अनेक महत्त्वाच्या ११० शिफारशी दिल्या आहेत. ऊस संशोधन केंद्र, पाडेगावने विकसीत केलेल्या ऊसाच्या फुले २६५ आणि को ८६०३२ वाणांनी ऊस क्षेत्रात क्रांती केली असून त्याचा लाभ असंख्य ऊस उत्पादकांना होत आहे. या वाणांखाली महाराष्ट्र राज्यात ७५ टक्के क्षेत्र लागवडीखाली आहे. या वाणांनी आत्तापर्यंत राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रु. १,००,७८७ कोटी दिले आहे. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राच्या आतापर्यंतच्या या गौरवशाली कार्यामुळेच सदरच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाने मान्यता देवून भरीव निधी मंजूर केला आहे. राज्याच्या व देशाच्या अर्थकारणामध्ये मोलाचे योगदान असलेले पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राच्या विविध विकास कामांच्या प्रस्तावाला राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आजी माजी कृषि मंत्री, प्रधान सचिव यांनी मंजुरी देवून या केंद्राला सहकार्य केल्याबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी त्यांचे आभार मानून समाधान व्यक्त केले.

## मृदाशास्त्र विभागांतर्गत चार दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन

**दि. ४ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर महाविद्यालयातील मृदाशास्त्र विभागामध्ये चार दिवसीय माती व पाण्याची चाचणीमधील विश्लेषणात्मक तंत्रे या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. श्रीगणेश शेळके व डॉ. रितु ठाकरे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की माती व पाण्याचा पीएच हा पिकांसाठी खूप महत्त्वाचा आहे. योग्य पीएचमुळे खतांची मात्रा योग्य प्रमाणात पिकांना उपलब्ध होते. यासाठी माती व पाण्याचे परीक्षण करूनच पिकांना खते देणे शेतकऱ्यांसाठी







फायदेशीर आहे. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. प्रशांत बोडके म्हणाले की दिवसेंदिवस जमिनीची प्रत खराब होत आहे. आपल्या पुढच्या पिढीला शेतीतून चांगले उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे आरोग्य चांगले असणे महत्त्वाचे आहे. पिकांद्वारे खतांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी माती परीक्षण करुन खते देणे गरजेचे आहे. आपण जसे आपले आरोग्य जपतो तसेच माती व पाण्याचे आरोग्य जपण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केले पाहिजेत. या प्रशिक्षणासाठी आलेल्या प्रशिक्षणार्थींनी माती व पाणी तपासणी करण्याबरोबरच शेतकऱ्यांना त्याविषयीचे योग्य मार्गदर्शन करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. भीमराव कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते मृदशास्त्र विषयावरील पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी दहा जिल्ह्यातून कृषि विज्ञान केंद्र, विद्यापीठातील मृदा शास्त्र विषयातील अधिकारी, खाजगी माती तपासणी प्रयोगशाळेतील कर्मचारी असे २५ प्रशिक्षणार्थी उपस्थित आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रितू ठाकरे यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी आंतरविद्या शाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, जीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश लोखंडे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ, मृदाशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सोलापूर येथील विभागीय संशोधन केंद्राला मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सदिच्छा भेट






**दि. १२ ऑगस्ट, २०२५.** सोलापूर येथील विभागीय संशोधन केंद्राला महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विभागीय संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर आणि इतर शास्त्रज्ञ उपस्थित होते. यावेळी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करताना म्हणाले की सोलापूर येथील विभागीय संशोधन केंद्राने कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी विविध प्रकारच्या २०० पेक्षा अधिक शिफारशी प्रसारित केलेल्या आहेत. ब्रिटिश काळामध्ये स्थापन झालेल्या या संशोधन केंद्राने आपल्या कार्यातून नावलौकिकात भर घातली आहे.

कोरडवाहू शेतीच्या उन्नतीसाठी या केंद्राने मृद व जलसंधारण, शेततळे, पीक पद्धती, विविध वाण, कोरडवाहू फळझाडे लागवड तंत्रज्ञान, आंतरपीक पद्धती तसेच कृषी यांत्रिकीकरण याविषयीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शेतावर पोहोचविण्याचे भरीव काम केले आहे. याचबरोबर कोरडवाहू शेतीमध्ये एकात्मिक शेती पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मुळेगाव प्रक्षेत्रावर चालणाऱ्या विविध प्रयोगांची पाहणी केली. यावेळी त्यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी विभागीय कृषी संशोधन केंद्राच्या कार्याचा आढावा यावेळी सादर केला. डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकांचे विमोचन यावेळी डॉ. शरद गडाख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये हर घर तिरंगा अभियान संपन्न





**दि. १४ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, पदव्युत्तर महाविद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पदव्युत्तर महाविद्यालयापासून सुरु झालेली रॅली कृषि अभियात्रिकी महाविद्यालयामार्गे काढण्यात आली होती या रॅलीची सांगता प्रशासकीय इमारतीसमोर करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, कृषी तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, संचालक राष्ट्रीय सेवा योजना डॉ. सुनील भनगे, उद्यान विद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उत्तम कदम, वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर.टी. गायकवाड, डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. रवि आंधळे, डॉ. संजय कोळसे, डॉ. देविदास खेडकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ, पदव्युत्तर महाविद्यालयाचे क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, डॉ. संगीता शिंदे, डॉ. अधिर आहेर, लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के, सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, पदव्युत्तर महाविद्यालय तसेच कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हर घर तिरंगा या अभियानाविषयी क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी यांनी माहिती दिली.

याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की देशाचा ७९ वा स्वातंत्र दिन संपूर्ण देशभर उत्साहात साजरा होत आहे. या अंतर्गत दि. १३ ते १५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे प्रत्येक भारतीय कुटुंबाला भारत देशाचा ध्वज फडकविण्याची संधी मिळते व त्यामुळे एकता, देशभक्ती आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना वृध्दिंगत होते. तरी सर्वांनी या हर घर तिरंगा अभियानात सहभाग घ्यावा.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांबरोबर सुसंवाद व प्रक्षेत्रभेट कार्यक्रम संपन्न

**दि. १३ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम प्रकल्पमार्फत मौजे तांभेरे व कणगर येथे शेतकऱ्यांबरोबर सुसंवाद व प्रक्षेत्र भेटीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे,





भारतीय कृषि अनुसंधान परिषद शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सचिन सदाफळ तसेच प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख, तांभेरे गावचे प्रगतशील शेतकरी मेजर ताराचंद गागरे, किरण मगर व राहुल कोऱ्हाळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत तांभेरे आणि कणगर येथील सोयाबीन व डाळिंब प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावरील पिके अतिशय उत्कृष्ठ आहेत. विद्यापीठाने विकसीत केलेले फुले मायक्रो ग्रेड–२ आणि फुले बायोमिक्स या सूक्ष्म अन्नद्रव्य व जैविक खतांचा वापर या प्रक्षेत्रांवर झाल्यामुळे सोयाबीन फुले किमया आणि डाळिंब भगवा रोग विरहित आणि उत्कृष्ठ स्थितीत आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी विद्यापीठ उत्पादित बियाणे, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैविक खते आणि जैविक बुरशीनाशके यांचा वापर करुन अधिक उत्पादन घ्यावे तसेच विद्यापीठ उत्पादित निविष्ठांना शेतकऱ्यांनी प्राध्यान द्यावे. याप्रसंगी डॉ. सचिन सदाफळ व डॉ. भगवान देशमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मेजर ताराचंद गागरे यांनी फुले मायक्रो ग्रेड–२ आणि फुले बायोमिक्सचा या जैविक निविष्ठांचा पिकांवर चांगला परिणाम दिसून येत असल्याचे सांगितले. याप्रसंगी कणगर येथील प्रगतशील शेतकरी एकनाथ गाढे आणि रावसाहेब गाढे यांच्या सोयाबीन फुले किमया या प्रक्षेत्राला भेट दिली. तसेच कल्याण गाढे यांच्या डाळिंब–भगवा या प्रक्षेत्राला भेट दिली. तांभेरे येथील मेजर ताराचंद गागरे, महेश गागरे, महेश मुसमाडे, लक्ष्मण गागरे, सोमनाथ मुसमाडे यांच्या सोयाबीन किमया या प्रात्यक्षिकांना मान्यवरांनी भेटी दिल्या. या भेटीदरम्यान तांभेरे व कणगर गावचे शेतकरी उपस्थित होते. या प्रक्षेत्र भेटीचे नियोजन प्रक्षेत्र सहाय्यक किरण मगर व राहुल कोऱ्हाळे यांनी केले.

## मृदाशास्त्र विभागामध्ये माती व पाण्याची चाचणीमधील विश्लेषणात्मक तंत्रे या विषयावरील प्रशिक्षण संपन्न





**दि. ९ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर महाविद्यालयातील मृदाशास्त्र विभागामध्ये चार दिवसीय माती व पाण्याची चाचणीमधील विश्लेषणात्मक तंत्रे या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे होते. याप्रसंगी

मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. श्रीगणेश शेळके व डॉ. रितु ठाकरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. साताप्पा खरबडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की माती व पाणी प्रशिक्षणामध्ये मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्यातील उद्योजकता विकसित करण्यासाठी करा. आपल्या ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांना कसा होईल ते पहा. आपण आजपर्यंत जमिनीच्या आरोग्याकडे अक्षम्य असे दुर्लक्ष केलेले आहे. त्यासाठी सगळ्यांनी एकत्र येऊन जमिनीच्या आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. या प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थींनी माती व पाणी तपासणीसाठी चांगल्या पद्धतीचे सॉफ्टवेअर वापरावीत तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचाही वापर कसा होईल ते पहावे. यामुळे माती व पाणी परीक्षण अधिक परिणामकारकपणे होऊन त्याचा फायदा शेतकरी बांधवांना होईल असे यावेळी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भीमराव कांबळे यांनी केले. यावेळी प्रशिक्षणातील सहभागी प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रितू ठाकरे यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील,डॉ. संजय तोडमल, डॉ. सुभाष घोडके, डॉ. क्रांती पाटील, मृदाशास्त्र विभागातील कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात वार्षिक एनसीसी प्रशिक्षण शिबाराचे आयोजन





**दि. ८ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात वार्षिक एनसीसी प्रशिक्षण शिबाराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन १७ महाराष्ट्र बटालियन (एनसीसी) चे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रसाद मिजार होते. याप्रसंगी सुभेदार मेजर राजेश कुमार, सुभेदार श्रीकांत मोरे, सुभेदार मुकेश सिंग, सुभेदार राकेश कुमार, कॅप्टन सुनील फुलसावंगे, लेफ्ट. सतीश चोरमले, टी.ओ. नर्मता गागरे, सीटीओ पुजा पाटील, बाबूजी म्याना, प्रतीक शिंदे, नवनाथ जोगदंड उपस्थित होते.

यावेळी कर्नल प्रसाद मिजार मार्गदर्शन करतांना म्हणाले की एनसीसीमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक कॅडेटच्या जीवनात शिस्तबध्दता येते. कॅडेटच्या चालण्यात, बोलण्यात, आचारणात अमुलाग्र बदल होतो व देशप्रमाची भावना व देशाप्रती आदरभाव जागृत होतो. एनसीसीमध्ये सहभागी झालेले कॅडेट यांना सैन्यदलात करिअर घडविण्याची संधी उपलब्ध होते. एनसीसीमुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होवून जीवनात शिस्तबध्दता येते. सशस्त्र दलात सजग व शिस्तप्रीय तरुणांची गरज आहे. एनसीसी हा केवळ एक अभ्यासक्रम नसून एक जीवनशैली आहे. या शिबिराला छ. संभाजीनगर येथील एनसीसी ग्रुप कमांडर अनुप गजानन बरबरे यांनी भेट दिली. यावेळी अनुप बरबरे म्हणाले शिस्तीमुळे जीवनात सकारात्मक बदल घडून येतात. शिबिरामध्ये जी शिस्त अंगिकारली आहे ती इतरांना देखील शिकवावी.

या शिबिरात प्रथमच ड्रिल स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. या ड्रिल स्पर्धेमध्ये चार कंपन्यांनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये ब्राहो कंपनी विजेती ठरली तर अल्फा कंपनी उपविजेती ठरली. या शिबिरात जिल्ह्यातील २९ महाविद्यालयांचे सुमारे ३५० कॅडेट्स सहभागी झाले आहेत. दहा दिवस चालणाऱ्या या निवासी शिबिरात त्यांना सैनिकी व व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षण शिबिरात कॅडेट्सना फिजिकल ट्रेनिंग, शस्त्रप्रशिक्षण, फिल्ड व बॅटल क्राफ्ट, नकाशा वाचन, ड्रिल यांसारखे लष्करी विषय शिकवले जाणार आहेत. याशिवाय व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य व स्वच्छता, सामाजिक सेवा, राष्ट्रीय एकता, आपत्ती व्यवस्थापन, प्रथमोपचार यासारख्या उपयुक्त विषयांचाही समावेश आहे. शिबिरात भारतीय लष्करातील अधिकारी, पर्मनंट इन्स्ट्रक्टर तसेच एनसीसी अधिकारी यांचे मार्गदर्शन

लाभत आहे. शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सैन्य प्रशिक्षणाबरोबरच समाजसेवेचे मूल्यही शिकवले जात असून, त्यातून जबाबदार व देशभक्त नागरिक घडवण्याचे कार्य एनसीसीच्या माध्यमातून होत आहे.

## सडे येथे कापूस पीक शिवारफेरी व शेतकरी मेळावा संपन्न





**दि. १९ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत असलेल्या कापूस सुधार प्रकल्पाच्या वतीने राहुरी तालुक्यातील सडे येथे प्रगतशील शेतकरी श्री. माधव ढमढेरे यांच्या शेतावर शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कापूस सुधार प्रकल्पाचे वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल होते. याप्रसंगी भुईमूग पैदासकार डॉ. डी. व्ही. देशमुख, सहाय्यक कापूस कृषीविद्यावेत्ता प्रा. पांडुरंग देशमुख, कापूस कीटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते, वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. भाऊसाहेब पवार, सडे गावचे ग्रामसेवक डॉ. अनंत इंगळे, मंडल कृषी अधिकारी श्री. आर. बी. मिसाळ व कृषी पर्यवेक्षक श्री. आशुतोष ढुमणे उपस्थित होते.

यावेळी डॉ. पवन कुलवाल यांनी कापूस पीक व्यवस्थापन व जमिनीचे आरोग्य चांगले राखण्यासाठीची उपाययोजना तसेच कापूस पिकाचे महत्त्व, शेंडा खुडणे, गळफांदी काढणे आणि कापूस पिकाचे कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. नंदकुमार भुते यांनी कापूस पिकावर येणाऱ्या कीड व रोग आणि त्यामुळे होणारे नुकसान तसेच पीक संरक्षणाबाबत करावयाच्या उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. भाऊसाहेब पवार यांनी कापूस पिकाची पातेगळ व त्यावरील उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. यावेळी खरीप हंगामातील कापूस पिकाची आद्यरेखा प्रात्यक्षिक पाहणी व शिवारफेरी श्री. संभाजीराव धोंडे, श्री. प्रभाकर पानसंबळ, श्री. सतीश धोंडे व श्री. बाजीराव धोंडे यांच्या शेतावर घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नानासाहेब मरकड यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती वर्षा डावरे यांनी केले. सदर शेतकरी मेळावा व शिवार फेरी या कार्यक्रमाचे नियोजन श्री. गणेश धोंडे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कुलसचिव श्री. राजेंद्रकुमार पाटील यांची सदिच्छा भेट



**दि. १३ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलसचिव श्री. राजेंद्रकुमार पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी श्री. राजेंद्रकुमार पाटील यांचा सत्कार करून महाविद्यालयाच्या कामकाज आणि उपक्रमांविषयी माहिती दिली. या भेटीदरम्यान श्री. राजेंद्रकुमार पाटील यांनी महाविद्यालयाचे प्रक्षेत्र, जिमखाना, ग्रंथालय तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वस्तीगृहांना भेट देऊन पाहणी केली. सोबतच त्यांनी महाविद्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचेशी सुसंवाद साधला. या भेटीदरम्यान श्री. राजेंद्रकुमार पाटील यांनी महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधीत केले व महाविद्यालयाच्या

कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. रमेश चौधरी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रियाज शेख, प्रा. नामदेव धुर्वे, सहा. नियंत्रक श्री. सुशांत उके, डॉ. कुशल ढाके, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील, डॉ. सुमित वासनिक आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठात आंतरमहाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धा संपन्न





**दि. २२ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये पदव्युत्तर महाविद्यालयांतर्गत आंतरमहाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धा–२०२५ संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सुनील भनगे होते. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी (पम) डॉ. विजय पाटील, फुले कृषी वाहिनीचे प्रमुख डॉ. आनंद चवई, प्रसारण केंद्रप्रमुख डॉ. सचिन सदाफळ, विद्यापीठ क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, क्रीडा अधिकारी (पम) डॉ. बाबासाहेब भिंगारदे, सहाय्यक कुलसचिव (पम) गोविंद तागडे, कृषी महाविद्यालय, पुणेचे क्रीडा अधिकारी डॉ. अभिजीत नलावडे, श्री. भाऊसाहेब बेल्हेकर,श्री. दत्तात्रय कदम, डॉ. सुरज गडाख व श्री.अभिजीत धनवडे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. सुनील भनगे म्हणाले की क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतल्यामुळे सांघिक भावना जोपासली जाते, ध्येय गाठण्याची इच्छा जागृत होते आणि जीवनात शिस्त निर्माण होते. यामुळे स्पर्धेत हारजीत महत्त्वाची नसून सहभाग महत्त्वाचा आहे. मुलांच्या कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस कृषी महाविद्यालय, पाणीव, जि. सोलापूर, द्वितीय क्रमांकाचे बक्षीस कृषी महाविद्यालय, पुणे तर तृतीय क्रमांकाचे बक्षीस कृषी महाविद्यालय, विळद, जि. अहिल्यानगर या संघास मिळाले. मुलींच्या कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगाव, जि. पुणे, द्वितीय क्रमांकाचे बक्षीस कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, सांगली तर तृतीय क्रमांकाचे बक्षीस कृषी महाविद्यालय, बारामती या संघास मिळाले. या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाच्या दहा जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील ४० कृषी महाविद्यालयातील मुलांचे ३५ संघ तर मुलींचे २९ संघ सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विविध संघाचे संघ व्यवस्थापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषी यांत्रिकीकरण काळाची गरज या विषयावरील प्रशिक्षण संपन्न

**दि. ३१ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील अखिल भारतीय समन्वित कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाच्या शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या शेतकऱ्यांसाठी कृषी यांत्रिकीकरण काळाची गरज या विषयावरील विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड होते. यावेळी कृषी यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख डॉ. तुळशीदास बाष्टेवाड, कृषी भूषण महिला शेतकरी सौ. प्रभावती घोगरे, कृषी यंत्र व अवजारे प्रकल्पातील डॉ. रविकिरण राठोड, प्रा. महेश पाचारणे व डॉ. संजय भांगरे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकऱ्यांनी आपले उत्पादन वाढीकरिता योग्य निविष्ठांचा वापर केला

वर्ष :५, अंक क्रं. : ५६, ऑगस्ट २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





पाहिजे. आज शेतीमध्ये विविध कामांसाठी मजुरांची अडचण भासत आहे. अशावेळी शेतीमधील विविध कामे करण्यासाठी यांत्रिकीकरणावर भर दिला जात आहे. शेतीमधील यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांचे परिश्रम कमी झाले आहेत. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. रवींद्र बनसोड म्हणाले की कृषी क्षेत्रामध्ये होत असलेल्या यांत्रिकीकरणामुळे या क्षेत्राची परावलंबतेकडून स्वयंपूर्णतेकडे वाटचाल होत आहे. शेतीमधील यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांचा वेळ तसेच पैशाची बचत होऊन याचा फायदा त्यांच्या उत्पन्नवाढीमध्ये होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी डॉ. बनसोड यांनी शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा सहभाग याविषयी सखोल माहिती दिली. यावेळी झालेल्या तांत्रिक सत्रामध्ये डॉ. तुळशीदास बाष्टेवाड यांनी राहुरी कृषी विद्यापीठाने विकसित केलेली आधुनिक कृषी अवजारे व यंत्रे, डॉ. सचिन नलावडे यांनी आधुनिक शेतीमध्ये ड्रोनचे महत्व, डॉ. रवीकिरण राठोड यांनी ऊस शेतीसाठी उपयुक्त यांत्रिकीकरण, प्रा. महेश पाचारणे यांनी फळबागेसाठी उपयुक्त यांत्रिकीकरण आणि डॉ. संजय भांगरे यांनी कृषी अवजारे व यंत्रे निगा, देखभाल व दुरुस्ती याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. सचिन नलावडे, सौ.प्रभावती घोगरे व श्री. मच्छिंद्र घोलप यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीदास बाष्टेवाड यांनी केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेश पाचारणे यांनी तर आभार डॉ. संजय भांगरे यांनी मानले या कार्यक्रमासाठी हनुमंतगाव, हसनापूर, लोणी,सात्रळ इ. गावांमधून शेतकरी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंजि. सलीम शेख, इंजि. मयूर शिंदे, इंजि. गिरीश भनगे आणि सर्व तांत्रिक कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नवलाने मेहेरगाव येथे धुळे कृषी महाविद्यालयातर्फे शेतकरी चर्चासत्र उत्साहात संपन्न




**दि. १९ ऑगस्ट, २०२५.** कृषी महाविद्यालय, धुळे अंतर्गत ग्रामीण कृषी जागरूकता आणि कार्यानुभव कार्यक्रमाचे नवलाने मेहेरगाव ग्रुपच्या विद्यार्थिनी तर्फे शेतकरी चर्चासत्र कृषी तंत्र विद्यालय, मेहरगाव येथे आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी एम इल्हे होते. या चर्चासत्रात मका कापूस पिकांवरील एकात्मिक कीड व्यवस्थापन, शाश्वत शेतीसाठी माती व्यवस्थापन व कांदा, डाळिंब पिकांवरील कीड व्यवस्थापन या विषयावर कृषी महाविद्यालय धुळे व कृषी विज्ञान केंद्र धुळे च्या तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये डॉ. बी.एम. इल्हे यांनी कांदा लागवड, कांदा साठवणूक, डाळिंब टोमॅटो पिकांवरील कीड व्यवस्थापन, कृषी विज्ञान केंद्राचे मृदा विशेषज्ञ डॉ. आतिश पाटील यांनी शेतीसाठी असलेले मातीचे महत्त्व माती परीक्षण व पाणी परीक्षणाचे महत्त्व व ते कसे करायचे यावर, पीक संरक्षण विशेषज्ञ डॉ. पंकज पाटील यांनी मका कापूस पिकांवरील एकात्मिक कीड व्यवस्थापन, बीज प्रक्रिया, खतांचा योग्य वापर यावर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रासाठी रावे कार्यक्रम समन्वयक डॉ. जे.एच. गायकवाड, रावे सेंटरच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. सोनाली गदमले तसेच आदर्श शेतकरी श्री. गुलाबराव पाटील, मेहेरगावचे सरपंच

श्री. विवेक भामरे, नवलानेचे सरपंच श्री. भीमा सूर्यवंशी, कृषी सहाय्यक श्री. वानखेडे, मेहेरगावच्या ग्रामसेविका श्रीमती शितल ढोले व नवलानेचे ग्रामसेवक श्री. मोहित वारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुल, काष्टी अंतर्गत शेतकरी मेळावा संपन्न



**दि. ५ ऑगस्ट, २०२५.** छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुल, काष्टी येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यक्रमातंर्गत सौंदाणे येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शेतकरी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. एस.बी. नांदगुडे होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. पी. सोनवणे, सौंदाणे गावचे सरपंच श्री. चेतन पवार व नांदगाव बुद्रुक गावच्या सरपंच श्रीमती अंजनाबाई देवरे या उपस्थित होत्या. यावेळी कार्यक्रम समन्वयक डॉ. आर.पी. खुळे, किटकशास्त्र विभागाचे विषयतज्ञ डॉ. एस.डी. पाटील, सहयोगी प्राध्यापक डॉ. वाय.जे. पाटील, विषयतज्ञ डॉ. पी. एन. सोनवणे, डॉ. डी.आर. बिरारी व डॉ. एच.एन. मारकड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. पी. खुळे यांनी केले. यावेळी डॉ. एस.डी. पाटील यांनी जैविक कीटकनाशकाची उपयुक्तता आणि डाळिंब पिकावरील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, डॉ. वाय.जे. पाटील यांनी माती परीक्षण यावर, डॉ. पी.एन. सोनवणे यांनी फळबाग लागवड या विषयावर, डॉ. डी.आर. बिरारी यांनी दुग्ध व्यवसाय याबद्दल, डॉ. एच.एन. मारकड यांनी मका पिकावरील लष्करी अळीचे नियंत्रण या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या होण्यासाठी रावे चेअरमन डॉ. एस.पी. सोनवणे, डॉ. आर.पी. खुळे, डॉ. आर.एल. पाटील, डॉ. पी.के. सूर्यवंशी, सौंदाणे गावचे ग्राम कृषी अधिकारी श्री. मच्छिंद्र साळुंखे, ग्राम विकास अधिकारी श्री. डी.एस. जाधव, सौंदाणे व नांदगांव (बु) या गावातील कृषिदुत आनंद जाधव, किरण ढेपले, अजय मेटे, आकाश देवरे, रोहित डिंगर, प्रथमेश माने, महेश जाधव, धिरज जाधव, सुजित चौधरी, पियुष देसाई, प्रेमकुमार आडसुळ व पायल केदारे, चेतना आहेर, कौशल्या बहिराम यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा महाले आणि मानसी कातकडे यांनी तर आभार भाग्यश्री चौधरी हिने मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगावअंतर्गत जावळी तालुक्यातील आखाडे गावात प्रक्षेत्र भेटीचे अयोजन

**दि. ४ ऑगस्ट, २०२५.** कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव व कृषी महाविद्यालय, पुणे व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जावळी तालुक्यातील आखाडे गावातील शेतकऱ्यांना शेतीवर प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रक्षेत्र भेटीदरम्यान कृषी महाविद्यालयाचे जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळेचे प्रमुख डॉ. संतोष मोरे यांनी उपस्थित राहून या किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असून शेतकऱ्यांनी फवारणी करताना कीटकनाशकांच्या मात्रा गरजेपुरत्या व शिफारशीनुसारच वापराव्यात जेणेकरून मित्रकिटकांचे संगोपन होईल, असे आवाहन केले. विषय विशेषज्ञ डॉ. स्वाती गुर्वे यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने लोकरी माव्याची ओळख, जाती, नुकसानीचा प्रकार व जीवन चक्र याविषयी माहिती दिली. शेतकऱ्यांनी योग्य पद्धतीने एकात्मिक व्यवस्थापन करून लोकरी मावा ही कीड नियंत्रणात येऊ शकतो, असे कृषी विज्ञान केंद्र, बोरगांवचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर यांनी शेतकऱ्यांना सांगितले. कृषी महाविद्यालय, पुणे येथील विभागीय विस्तार केंद्राचे वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. विकास भालेराव यांनी ऊस पिकात फवारणीसाठी ड्रोनचा वापर करणे गरजेचे असून कीटकनाशकांची फवारणी करताना त्यामध्ये कोणतीही खते एकत्रित करू नयेत, कारण नत्रयुक्त खतांच्या मात्रा जास्त झाल्यास लोकरी माव्या सारख्या रसशोषक किडींचा प्रार्दुभाव वाढण्याची शक्यता असल्याचे सांगितले. या वेळी उपकृषी अधिकारी श्री. एम. डी. माने, श्रीमती नेहा देवगुडे, श्री. पांडुरंग खाडे, सरपंच श्री. सखाराम गायकवाड, श्री. आत्माराम शिंदे, श्री. संकेत शिंदे उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे रॅगिंग विरोधी जनजागृती महाउत्सव उत्साहात साजरा

**दि. १२ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगाव येथे विद्यापीठ अनुदान आयोग आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांच्या निर्देशांनुसार सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रॅगिंग विरोधी जनजागृती महाउत्सव दि. १२



ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला. या महाउत्सवादरम्यान विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष तथा सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदिप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध जागृती पर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास डॉ. गणेश देशमुख, कूलमंत्री डॉ. रमेश चौधरी, प्रा. नामदेव धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सुमित वासनिक उपस्थित होते. यावेळी डॉ. संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना रॅगिंग विरोधी जनजागृती संदर्भात मार्गदर्शन करतांना रॅगिंग करणे कायद्याने गुन्हा आहे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ. रमेश चौधरी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रॅगिंग केवळ कायद्याने गुन्हा नाही, तर ती विद्यार्थ्यांमधील सहविचार आणि सुसंस्कृततेवर आघात करणारी कृती आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने नवीन विद्यार्थ्यांना आपले सहकारी म्हणून स्वीकारले पाहिजे आणि सुरक्षित, प्रेरणादायक वातावरण निर्माण केले पाहिजे. या सप्ताहात विद्यार्थ्यांनी www.antiragging.in या यूजीसीच्या अधिकृत अँटी रॅगिंग पोर्टलबद्दल माहिती घेतली. या संकेतस्थळावरून रॅगिंगविरोधात तक्रार दाखल करणे, कायदे व नियम समजून घेणे तसेच शपथपत्र भरता येते. विद्यार्थ्यांना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना अँटी रॅगिंग आणि सन्मानपूर्वक सहजीवनाची शपथ दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रॅगिंगविरोधी वातावरण निर्माण करण्याच्या महत्त्वपूर्ण टप्प्यात योगदान दिले. याप्रसंगी सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विविध दिन साजरे

### महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत कोंढवड येथे शाश्वत शेती दिन संपन्न





**दि. ७ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या जन्मदिन शताब्दीनिमित्त शाश्वत शेती दिन कार्यक्रमाचे आयोजन कोंढवड येथे श्री. दत्तात्रय केशव म्हसे यांच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी व्यासपीठावर वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र गायकवाड, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. उल्हास सुर्वे, वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, कीटकशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मंगेश बडगुजर, कापूस सुधार प्रकल्पाचे सहाय्यक कीटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते, राहुरीचे तालुका कृषि अधिकारी श्री. बापुसाहेब शिंदे, शिलेगावचे सरपंच श्री. पांडुरंग म्हसे, कोंढवड येथील विकास कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन श्री. उत्तमराव म्हसे, प्रगतशील शेतकरी श्री. साहेबराव म्हसे श्री. दत्तात्रय म्हसे उपस्थित होते.

यांप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांचा जन्मदिवस आपण शाश्वत शेती दिन म्हणुन साजरा करत आहोत. डॉ. स्वामिनाथन यांनी संशोधन करुन गहू व भाताचे अधिक उत्पादन देणारे वाण विकसीत केले. या संशोधीत वाणांमुळे आपल्या देशात हरित क्रांती आली आणि देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला व आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला. याप्रसंगी शाश्वत शेती दिनानिमित्त विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ. रविंद्र गायकवाड यांनी शाश्वत शेतीमध्ये फुले सुपर बायोमिक्सचा वापर, डॉ. पवन कुलवाल यांनी कापुस पिकाच्या अधिक उत्पादनासाठी वाढ व्यवस्थापन तंत्रज्ञान, डॉ. उल्हास सुर्वे यांनी शाश्वत शेती, डॉ. मंगेश बडगुजर यांनी ऊस पिकातील हुमणी अळी व पांढरी माशी व्यवस्थापन, डॉ. नंदकुमार भुते यांनी कापुस पिकातील एकात्मिक किड व्यवस्थापन या विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषि अधिकारी श्री. बापुसाहेब शिंदे यांनी केले. यावेळी मान्यवरांनी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेट देवून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार श्री. अशोक गिरगुणे यांनी मानले. या कार्यक्रमास कोंढवड येथील पद्मावती शेतकरी गटाचे शेतकरी सदस्य, कोंढवड पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये शाश्वत शेती दिन संपन्न





**दि. ७ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या जन्मदिन शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शाश्वत शेती दिन कार्यक्रमात अध्यक्षस्थी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. यावेळी व्यासपीठावर या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कृषीभूषण श्री. सुरसिंग पवार उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले व सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की आपल्या देशातील शेतीमध्ये उत्कृष्ट संशोधन करून क्रांतीचे रोप डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी लावले. यालाच आपण हरितक्रांती असे म्हणतो. डॉ. स्वामीनाथन यांनी भात व गहू पिकामध्ये केलेल्या संशोधनामुळेच देश भुकेच्या संकटातून वाचला. डॉ. स्वामीनाथन यांनी केलेल्या शेतीमधील संशोधनामुळेच ते उज्वल्य राष्ट्र प्रेमाचे प्रतीक ठरतात. आपण सर्वजण देशासाठी तसेच शेतकऱ्यांसाठी समर्पित भावनेने करीत असलेले काम हीच डॉ. स्वामीनाथन यांना खरी आदरांजली ठरेल असे उद्‌गार डॉ. शिर्के यांनी यावेळी काढले.

श्री. सुरसिंग पवार आपल्या भाषणात म्हणाले की विसाव्या शतकामध्ये देश घडविणाऱ्या व्यक्तींमध्ये डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे कार्य खरोखरीच उल्लेखनीय आहे. त्यांनी शेतीत संशोधनाचे फार मोठे कार्य केले. त्याकाळी शेतकऱ्यांच्या हातात फक्त शेती पिकविणे होते. डॉ. स्वामीनाथन यांनी केलेल्या शेतीमधील संशोधनामुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला. यावेळी डॉ. रवींद्र बनसोड, डॉ. विजू अमोलिक व डॉ. नितीन दानवले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उल्हास सुर्वे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कृषीविद्या विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. राजेंद्र गेठे व विद्यार्थी श्री. विश्वजीत काळे यांनी डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचा जीवन परिचय करून दिला. याप्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, डॉ. एम.आर. पाटील, डॉ. सुनील कदम, डॉ. विजय पाटील, डॉ. प्रकाश लोखंडे,

वर्ष :५, अंक क्रं. : ५६, ऑगस्ट २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रकल्प प्रमुख डॉ. सुरेश दोडके, डॉ. पवन कुलवाल, डॉ. नरेंद्र काशिद, डॉ. रवि अंधळे, डॉ. सिनारे, डॉ. रविंद्र निमसे, डॉ. अधीर आहेर उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमानंतर शिवार फेरी व प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. इक्बाल बागवान यांनी तर आभार डॉ. उल्हास सुर्वे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या जयंतीनिमित्त शाश्वत कृषि दिनाचे आयोजन



**दि. ११ ऑगस्ट, २०२५.** कृषी क्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन यांच्या जयंतीनिमित्त शाश्वत कृषी दिनाचे आयोजन सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार डॉ. सुधीर तांबे होते. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी कल्याण मंडळाचे डॉ. सुनील भनगे, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही.बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, प्रशासकीय अधिकारी प्रा. जी.बी बाचकर, डॉ. व्हि.डी. वाळे आदींसह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक उपस्थित होते. यावेळी डॉ. सुधीर तांबे, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ व डॉ. सुनील भणगे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर आभार प्रा. जी.बी. बाचकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. सातप्पा खरबडे म्हणाले की डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांनी केलेल्या संशोधनाचा गाभा अन्नधान्य उत्पादन वाढविणे हाच राहिला. त्यांनी संशोधीत केलेल्या गहू आणि तांदळाच्या उच्च उत्पादक वाणांमुळे देशात अन्नधान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन भारत अन्नधान्यात आत्मनिर्भर झाला. ज्यामुळे देशात हरित क्रांतीचा उदय झाला. डॉ. स्वामिनाथन यांच्या कार्यामुळे केवळ उत्पादन वाढले नाही तर त्यांनी शेतीच्या शाश्वततेवर भर देवून शाश्वत शेती या संकल्पनेचा पुरस्कार केला.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ ग्रंथालयात डॉ. एस.आर. रंगनाथन जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा



**दि. १२ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठतील विद्यापीठ ग्रंथालयात ग्रंथालय विज्ञानाचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ सचिन नलावडे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे ग्रंथपाल तथा संख्या शास्त्र विभाग प्रमुख डॉ. एम. आर. पाटील उपस्थित होते. याप्रसंगी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ उपस्थित होते.

यावेळी डॉ. सचिन नलावडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की तमिळनाडूतील शियाली येथे ९ ऑगस्ट १८९२ रोजी जन्मलेले डॉ. शियाली रामामृत रंगनाथन हे भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ओळखले जातात. सुरुवातीला गणिताचे प्राध्यापक असलेले रंगनाथन १९२४ साली मद्रास विद्यापीठात ग्रंथपाल म्हणून कार्यरत झाले आणि ग्रंथालय विज्ञान क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणले. त्यांचे तत्त्वज्ञान व कार्य आजही जगभरातील ग्रंथालय विज्ञानाच्या अभ्यासक्रमात

मार्गदर्शक ठरत आहे. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. एम. आर. पाटील म्हणाले कि डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी जगप्रसिद्ध ग्रंथालय शास्त्राचे पाच नियम मांडले तसेच कोलन वर्गीकरण पद्धती विकसित केली. त्यांनी ग्रंथालयावर अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन १९५७ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर करून आपले ज्ञानवर्धन करण्याचे आणि वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी ग्रंथालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठात फाळणी दुःखद स्मृतिदिन साजरा



**दि. १४ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, पदव्युत्तर महाविद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने फाळणी दुःखद स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सुनील भणगे, आंतरविद्या शाखा जलव्यवस्थापन विभाग प्रमुख तथा पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजय पाटील, डॉ. देविदास खेडकर, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, पदव्युत्तर महाविद्यालयाचे क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, डॉ. संगिता शिंदे, लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के व पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गोविंद तागडे उपस्थित होते. यावेळी डॉ. अधीर आहेर फाळणी दुःख स्मृती दिनाविषयी माहिती देतांना म्हणाले की दि. १४ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताच्या फाळणी दरम्यान लाखो लोकांनी अनुभवलेल्या दुःख आघात व विस्थापनाचे स्मरण करण्यासाठी फाळणी दुःखद स्मृतिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा पवित्र उत्सव फाळणीच्या प्रचंड मानवी नुकसानाची आठवण करून देतो आणि शांतता, एकता आणि सलोखा या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश ठेवतो. फाळणीनंतरच्या काळात लोकसंख्येचे प्रचंड प्रमाणात स्थलांतर झाले. सुमारे १.४५ कोटी लोकसंख्या फाळणीने प्रभावित झाली आणि नंतर उफाळलेल्या दंगलीत एकूण दहा लाख लोकांनी प्राण गमवावे लागल्याचा अंदाज आहे. यावेळी विद्यापीठातील कर्मचारी, पदव्युत्तर महाविद्यालय तसेच कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठात देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न





**दि. १५ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव

श्री. राजेंद्रकुमार पाटील, नियंत्रक डॉ. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड कृषी तंत्रज्ञान चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके,प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले, सर्व विभाग प्रमुख, एनसीसी अधिकारी लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे व सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण या तीनही विभागात महात्मा फुले कृषी विद्यापीठ चांगली कामगिरी करत आहे. विद्यापीठाने आतापर्यंत ३१४ वाण, ५४ सुधारित अवजारे व १८२७ तंत्रज्ञान शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारित केल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने सुधारित पदवी अभ्यासक्रम विद्यापीठात राबविण्यात येत आहे. अशा प्रकारे देशाच्या विकासात कृषि विद्यापीठ भरीव योगदान देत आहे. यावेळी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात रक्तदान शिबिराचेही आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सुनील भनगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे यांनी सूत्रसंचालन केले. स्वातंत्र्यदिनाच्या या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात अँटी रॅगींग डे साजरा





**दि. १८ ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयात अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्या मार्गदर्शनाखाली अँटी रॅगींग डे साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सुनील भणगे होते. याप्रसंगी व्यासपीठावर पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा आंतरविद्याशाखा जलव्यवस्थान विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, विद्यापीठ क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ, क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, सहाय्यक कुलसचिव श्री. गोविंद तागडे उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. सुनील भणगे म्हणाले की रॅगींगमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाद होतात, मानसिक नैराश्यात जातात त्यामुळे शिक्षणावर परिणाम होतो. पदव्युत्तर महाविद्यालयात आलेले विद्यार्थी हे समजुतदार असतात. आपले पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी हे ध्येयवेडे आणि करिअर ओरियंटेड असल्याने ते कधीच रॅगींगच्या फंदात पडत नाहीत ही एक कौतुकाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी एकमेकांबरोबर प्रेमाने आणि सहकार भावनेने वागावे. यामुळे विद्यार्थी जीवन आनंदी होते.

यावेळी डॉ. विजय पाटील यांनी रॅगिंग म्हणजे काय, अँटी रॅगिंग कायदा तयार करण्यामागची पार्श्वभूमी समजावून सांगितली व या सर्व माहितीचे पावर पॉइंटद्वारे सादरीकरण केले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना अँटी रॅगींगची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास आवारी यांनी केले तर आभार डॉ. बाबासाहेब भिंगारदे यांनी मानले. यावेळी पदव्युत्तर महाविद्यायलयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथे शाश्वत शेती दिन संपन्न

**दि. ७ ऑगस्ट, २०२५.** विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथे भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या जन्मशताब्दी

निमित्ताने शाश्वत शेती दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संशोधन केंद्राचे प्रमुख तथा सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर यांनी डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या शेती संशोधनातील योगदानामुळे शेतीच्या उत्पादनात भरघोस वाढ झाल्याचे सांगून सद्यस्थितीत कृषि शास्त्रज्ञांनी बदलत्या हवामानानुसार शाश्वत शेतीस उपयुक्त असे संशोधन करणे गरजेचे आहे. असे संशोधन झाल्यास शेतकऱ्यांसाठी ते वरदान ठरेल असे नमुद केले. याप्रसंगी वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. मिलींद देशमुख व पुष्प विशेषज्ञ डॉ. सतिश जाधव यांनी डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या कार्याचा आढावा घेतला. वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. सुनिल लोहाटे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. त्यावेळी विभागीय कृषी संशोधन केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व माळी प्रशिक्षण वर्गाचे विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे शाश्वत शेती दिन संपन्न



**दि. ७ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा व कृषी महाविद्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय हरितक्रांतीचे जनक भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी निमित्त शाश्वत शेती दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. योगेंद्र नेरकर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन कृषी आयुक्त श्री सुरज मांढरे व नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन परिषद अनुवंशिकता तथा जनुकीय शास्त्राचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ एम.सी. खरकवाल उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार व प्रशिक्षण संचालक श्री. रफिक नायकवडी, फलोत्पादन व अभियांत्रिकी विभागाचे संचालक श्री. अंकुश माने, विभागीय कृषी सहसंचालक श्री. दत्तात्रय गवसनी, आत्माचे प्रकल्प संचालक श्री. सुरज मडके, कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. योगेंद्र नेरकर म्हणाले की डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी मिळाली त्यामुळे देशाची हरितक्रांती घडत असताना प्रत्यक्षदर्शी म्हणून मला मिळालेला अनुभव फार अनमोल आहे. शेती संदर्भातील शास्त्रीय तंत्रज्ञानाचे आकलन तत्कालीन राजकीय पुढारी व धोरणकर्ते यांना योग्य रीतीने समजून देऊन देशाला कृषी क्षेत्रामध्ये आत्मनिर्भर करण्याचा क्रांतिकारक प्रयत्न डॉ. स्वामीनाथन यांनी केला होता. त्यांनी खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतीशास्त्राला बहुमान मिळवून दिला आहे. फार्मर टू फार्मर तंत्रज्ञान प्रचाराची भूमिका मांडून शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार त्यांनी घडवून आणला आणि म्हणूनच केवळ भारतातील नाही तर जगाच्या कोपऱ्यातील सर्वच शेतकऱ्यांच्या गळ्यातील ताईत डॉ. स्वामीनाथन झाले आहेत धोरणकर्ते व राज्यकर्ते जेव्हा शास्त्रज्ञांच्या पाठीशी उभे राहतात तेव्हा खऱ्या अर्थाने क्रांती घडते आणि ती शाश्वत क्रांती असते याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे डॉ. स्वामीनाथन आहेत. वैश्विक कुटुंबातली प्रत्येक घटकाला, व्यक्तीला पोषक अन्न मिळावे यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वाहून घेतले असे ते म्हणाले.

याप्रसंगी बोलताना श्री सुरज मांढरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, देशातील कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. शाश्वत शेती दिनानिमित्त स्वामीनाथन यांची जन्मशताब्दी साजरी करत असताना त्यांनी मांडलेली शाश्वत उत्क्रांती, भूमातेची अवहेलना न करण्याची पर्यावरण पूरक भूमिका व उत्पादन व उत्पन्न यातील फरक लक्षात घेऊन मांडलेली योग्य भूमिका या अधिक महत्त्वाच्या बाबी आहेत. या कार्यक्रमात डॉ एम.सी. खरकवाल यांनी डॉ. स्वामीनाथन यांचे जीवनचरित्र उलगडण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये श्री. प्रज्वल अडसूळ यांना प्रथम या क्रमांकाचे तर श्री. वैष्णव काळे व श्री. शुभम दत्ता यांना द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषक देण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमास कृषी विभागातील विविध अधिकारी कर्मचारी शेतकरी वर्ग कृषी महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कृषि वनस्पतीशास्त्र विभागातील विभाग प्रमुख डॉ. डी. बी. लाड, डॉ. पी. वाय. शिंदे, डॉ. लीना शितोळे, डॉ. अनारसे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. वाय. शिंदे यांनी केले तर आभार डॉ. राजगुरू यांनी मानले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

ऑगस्ट २०२५

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



**दि. १ ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हाळगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनावणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यावेळी मार्गदर्शन करतांना म्हणाले की अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे अमूल्य असे काम त्यांनी केले. एक मराठी समाजसुधारक, लोककवी, लेखक, दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना ओळखले जाते असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. विद्यार्थी परिषद सभापती अनिकेत मिंड व रसिका पाटील यांनी अण्णाभाऊ साठे यांचे कार्य आपल्या मनोगतातून व्यक्त केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे शाश्वत शेती दिवस साजरा



**दि. ७ ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हाळगाव येथे हरित क्रांतीचे प्रणेते डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांची जयंती शाश्वत शेती दिवस म्हणून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनावणे होते. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. पोपट पवार, डॉ. गोकुळ वामन, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. संदीप मोरे, डॉ. निलेश लांडे, डॉ. महेश निकम, डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. निकिता धाडगे, डॉ. उत्कर्षा गवारे, अर्चना महाजन, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. किरण चौधरी, डॉ. अनिकेत गायकवाड व डॉ. धनेश्वर पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की भारतात १९६० च्या दशकात सुरुवात झालेल्या हरितक्रांतीमुळे कृषि उत्पादनात विक्रमी वाढ झाली. भारत अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करताना पर्यावरणाची आणि मानवी आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. परंतु या कालावधीत रासायनिक खते व कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे माती आणि पाण्याच्या प्रदूषणाची समस्या वाढली, जमिनीची सुपीकता कमी झाली तसेच पर्यावरणाचा समतोल बिघडला. भविष्यातील पिढ्यांची अन्नसुरक्षा जर सुनिश्चित करायची असेल तर शाश्वत शेती ही काळाची गरज आहे. यावेळी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी त्यांच्या भाषणातून डॉ. स्वामीनाथन यांचे कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले. विद्यार्थी प्रतिनिधी पायल विरकर व नुयेरा तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशा पाचारणे हिने केले. यावेळी श्री. संजय आढाव, श्री. संभाजी ठवाळ, श्री. सुरेश माकरे, श्री. प्रदिप धारेकर, श्री. किरण अडसुर, श्री. रामदास गुहाडे, श्री. मोबिन नदाफ, श्री. संजय सोनवणे, श्री. शशिकांत कांबळे, श्रीमती अनिता पुराणे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२५

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय गंथालय दिवस साजरा




**दि. १२ ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हाळगाव येथे राष्ट्रीय ग्रंथालय दिवस साजरा करण्यात आला. ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे पितामह पद्मश्री डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांचा जन्मदिवस हा संपूर्ण भारत देशात राष्ट्रीय ग्रंथालय दिवस म्हणून साजरा केला जातो. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी भारतातील ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या १३२ व्या जयंती निमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक (कृषि विस्तार) डॉ. प्रणाली ठाकरे यांनी पुस्तकरूपी ज्ञान टिकविण्यासाठी ग्रंथालयाची गरज आहे व आई, वडील व शिक्षकानंतर गुरु म्हणून ग्रंथांकडे पाहिले जावे. डॉ. रंगनाथन यांनी इ.स. १९३३ मध्ये कोलन वर्गीकरण पद्धती विकसित केली. बहुतांश राष्ट्रांमध्ये ह्या ग्रंथ पद्धतीचा वापर केला जातो. भारतात ग्रंथालयशास्त्र प्रमाणपत्र, ग्रंथालयशास्त्र पदवी प्रशिक्षण, पदव्युत्तर प्रशिक्षण व पीएच. डी. ची सुविधा त्यांनी निर्माण करून दिली अशी ओळख विद्यार्थ्यांना पटवून दिली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**दि. १५ ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन संपन्न झाला. याप्रसंगी ध्वजारोहण कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की ब्रिटिश राजवटीच्या अत्याचारातून देशातील जनतेला मुक्त करण्यासाठी शेकडो स्वातंत्र्यसैनिकांनी आपले प्राण अर्पण केले. स्वातंत्र्यदिन हा केवळ एक उत्सव नसून, भारतीय स्वातंत्र्यासाठी लढलेल्या  स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, संघर्ष आणि दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. यादिवशी देशाच्या विकासासाठी समर्पित राहण्याची प्रतिज्ञा आपण सर्वांनी घेतली पाहिजे. कृषि महाविद्यालय १ मे, २०२३ रोजी मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथून हाळगाव येथे प्रस्थापित झाले. त्यानंतर महाविद्यालयाच्या विकासकामांना सुरुवात झाली असून बरीच कामे प्रस्तावित आहेत. महाविद्यालय प्रगतीपथावर नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे असे प्रतिपादन डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी केले. विद्यापीठाच्या प्राप्त निधीतून या महाविद्यालयात १० एकर प्रक्षेत्र विकसित केलेले असून या खरीप हंगामात मूग, उडीद या पिकांचा विद्या र्थ्यांसाठी कौशल्य विकास उपक्रमांतर्गत मुलभूत बीजोत्पादन कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध पिकांच्या पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन केलेले आहे. यावेळी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून या महाविद्यालयात सुरु करण्यात आलेल्या बियाणे विक्री केंद्राचे तसेच उद्यानविद्या विभागाने ५१२ चौरस फुट जागेवर उभारलेल्या शेडनेटचे उद्घाटन डॉ. दत्तात्रय सोनवणे यांचे शुभहस्ते करण्यात आले. याद्वारे शेतकऱ्यांना खात्रीशीर फळपिकांची रोपे तयार करून देण्यात येतील. सदर कार्यक्रमासाठी

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. प्रणाली ठाकरे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय अँटी रॅगिंग सप्ताह साजरा



**दि. १८ ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय अँटी रॅगिंग सप्ताह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी व्यासपीठावर विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. प्रेरणा भोसले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनोज गुड, वसतिगृह कुलमंत्री डॉ. महेश निकम, उप कुलमंत्री प्रा. अर्चना महाजन, डॉ. निलेश लांडे, डॉ. धनेश्वर पाटील आदी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. दत्तात्रय सोनवणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शैक्षणिक संस्थामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास खेळीमेळीच्या वातावरणात व्हावा, सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेता यावे यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने १२ ऑगस्ट राष्ट्रीय अँटी रॅगिंग दिवस व १२ ते १८ ऑगस्ट हा राष्ट्रीय अँटी रॅगिंग सप्ताह साजरा करण्याचे निर्देशित केले आहे. रॅगिंग हे अक्षम्य कृत्य आणि गुन्हा म्हणून गणले जाते. महाविद्यालयाच्या परिसरात वावरतांना विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करावे, कोणतेही गैर कृत्य करू नये, तसेच येणाऱ्या शैक्षणिक वर्षांत महाविद्यालयात नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करावे.

यावेळी डॉ. महेश निकम यांनी वसतिगृहात शिस्तीचे पालन करून खेळीमेळीच्या वातावरणात वास्तव्य करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा. अर्चना महाजन यांनी रॅगिंग म्हणजे काय, अँटी रॅगिंग कायदा तयार करण्यामागची पार्श्वभूमी समजावून सांगितली. विद्यार्थी परिषद सभापती कु. अनिकेत मिंड यांनी रॅगिंग विरोधी कायदे स्पष्ट केले. कु. रसिका पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना लघुपटाद्वारे अँटी रॅगिंगची इत्यंभूत माहिती दाखवून अँटी रॅगिंग वेबसाईट, टोल फ्री क्रमांक, तक्रार नोंदणी प्रक्रिया इत्यादी बाबींबद्दल जागृत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात अँटी रॅगिंग सप्ताहाचे औचित्य साधून भित्तीचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना महाजन यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे सद्भावना दिवस साजरा





**दि. २० ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे सद्भावना दिवस व स्व. राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. प्रेरणा भोसले यांनी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेला

पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी सद्भावना दिवस हा सर्व धर्माच्या भारतीयांमध्ये राष्ट्रीय एकता, शांतता, सहानुभूती आणि सांप्रदायिक सौहार्दाला प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो असे आपल्या भाषणात नमूद केले. सर्वांनी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषाविषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्य प्रस्थापित करावे तसेच सर्व प्रकारचे मतभेद सोडून हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गांनी प्रश्न सोडविण्यासाठी आवाहन केले. विद्यार्थी प्रतिनिधी सुनिता मेमाणे व भुषण बाबर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमादरम्यान सद्भावना दिवसाच्या निमित्ताने सद्भावना दिवस प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशा पाचारणे हीने केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी



**दि. २५ ऑगस्ट, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे महानुभाव पंथाचे संस्थापक श्री. चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी, महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनावणे यांनी श्री. चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी चक्रधर स्वामींनी लिहीलेल्या लीळाचरित्र या मराठीतील पहिल्या चरित्रग्रंथाची माहिती दिली. वैदिक परंपरेला नाकारून सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणारे चक्रधर स्वामी हे महाराष्ट्रातील पहिले ज्ञात समाज सुधारक होत अशी ओळख विद्यार्थ्यांना पटवून दिली. विद्यार्थी प्रतिनिधी कु. निकिता बेद्रे हिने स्वामींचे समाज व धर्म सुधारणेतील कार्य आपल्या मनोगतातून स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. निशा पाचारणे हीने केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी





**दि.१ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. रमेश चौधरी, डॉ. गणेश देशमुख, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रियाज शेख, डॉ. नामदेव धुर्वे, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, सहा. नियंत्रक श्री. सुशांत उके, डॉ. कुशल

ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तुकाराम भाऊराव साठे हे अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात असेही डॉ. पाटील म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नामदेव धुर्वे यांनी तर आभार डॉ. कुशल ढाके यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांची जयंती शाश्वत शेती दिन म्हणून साजरी





**दि. ७ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या जन्म शताब्दीनिमित्त शाश्वत शेती दिन म्हणून महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. रमेश चौधरी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रियाज शेख, डॉ. नामदेव धुर्वे, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, सहा. नियंत्रक श्री. सुशांत उके, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी भारतरत्न डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांच्या कार्याची महिती देतांना सांगितले कि, डॉ. मोनकोंबू सांबशिवन स्वामीनाथन हे एक जागतिक कीर्तीचे कृषी शास्त्रज्ञ होते, ज्यांना भारतातील हरित क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भर बनला. सन १९६० आणि १९७० च्या दशकात त्यांच्या नेतृत्वात भारतात गहू आणि तांदळाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती विकसित करण्यात आल्या. त्याबद्दल त्यांना भारतीय हरितक्रांतीचे जनक म्हणून व्यापकपणे ओळखले जाते. या उपक्रमामुळे अन्न उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आणि भारताला अन्नटंचाईवर मात करण्यास मदत झाली. डॉ. स्वामीनाथन यांनी केवळ हरितक्रांतीपुरतेच मर्यादित काम केले नाही तर शाश्वत शेती आणि पर्यावरण संरक्षणासाठीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांना पद्मश्री, रोमन मेगासिस पुरस्कार, पद्मभूषण, जागतिक अन्न पुरस्कार, पद्मविभूषण, भारतरत्न यासारखे उच्च पुरस्कार मिळाले. याप्रसंगी महाविद्यालयात डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रमातील विद्यार्थ्यांनी भुसावळ तालुक्यातील साकेगाव, जळगाव तालुक्यातील नशिराबाद, यावल तालुक्यातील भालोद आणि हिंगोणा या गावांमध्ये भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या जन्म शताब्दीनिमित्त शाश्वत शेती दिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे महत्व समजावून दिले आणि जनजागृती केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे यांनी तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी मानले. यावेळी शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे जागतिक ग्रंथपाल दिवस उत्साहात साजरा

**दि. १२ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे जागतिक ग्रंथपाल दिवस तथा डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा स्मृतीदिन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय ग्रंथालयाचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. एस. आर. रंगनाथन याच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याची माहिती करून देण्यात आली. याप्रसंगी डॉ. बाळासाहेब रोमाडे, प्रा. नामदेव धुर्वे, सहा. नियंत्रक श्री. सुशांत उके, डॉ. कुशल ढाके, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील, डॉ. सुमित वासनिक उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन याच्या जीवनकार्याची माहिती देतांना सांगितले कि डॉ. शियाळि रामामृत रंगनाथन् हे एक भारतीय गणितज्ञ आणि पुस्तकालय तज्ञ होते. भारतीयांमध्ये वाचनसंस्कृती अधिकाधिक रुजावी यासाठी डॉ. रंगनाथन् यांनी ग्रंथालयशास्त्र आणि त्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले. आधुनिक भारतातील ग्रंथालयांच्या विकासात डॉ. रंगनाथन् ह्यांचा फार मोठा वाटा आहे. देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची कवाडं विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन् ह्यांनीच रूजवला. नंतर तो जोपासण्यासाठीही आपले संपूर्ण आयुष्य झिजवले. डॉ. रंगनाथन् यांनी मांडलेले पाच पुस्तकालयविज्ञान सिद्धांत हे भारतीय पुस्तकालयविज्ञानाचा पाया समजले जातात असेही डॉ. पाटील म्हणाले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ७९ वा स्वातंत्रदिन उत्साहात संपन्न





**दि. १५ ऑगस्ट, २०२५.** कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ७९ वा स्वातंत्रदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. गणेश देशमुख, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रियाज शेख, डॉ. नामदेव धुर्वे, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील, डॉ. सुमित वासनिक आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी ध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी सांगितले कि, २०२५ या वर्षी आपण देशाचा ७९ वा स्वातंत्र दिन साजरा करीत आहोत. आपल्याला स्वातंत्र मिळविण्यासाठी अनेक महान स्वातंत्रसेनानी, समाज सुधारक, क्रांतिकारी आणि देशभक्तांनी त्याच्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांनी पाहिलेली स्वप्ने साकार करण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध आहोत. आपल्या मार्गदर्शनात डॉ. पाटील यांनी महाविद्यालयातील ठळक घडामोडी सांगितल्या. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंद्रधनुष्य या राज्यस्तरीय कार्यक्रमात प्रथम पारितोषिक मिळविल्याबद्दल अभिनंदन केले तसेच महाविद्यालयाला ५००० बांबूचे जीवन कुंपण करण्यात आल्याचेही डॉ. पाटील म्हणाले. महाविद्यालयामध्ये मनुष्यबळ कमी असून सुद्धा सुरु असलेल्या प्रगतीतील सर्वांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांनी महाविद्यालयाचे प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचारी यांचे विशेष कौतुक केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती सदभावना दिवस म्हणून साजरी

**दि. २० ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारताचे माजी पंतप्रधान राजीव

गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्याच्या कार्याची माहिती उपस्थितांना करून देण्यात आली. यावेळी उपस्थितांना सदभावना प्रतिज्ञा देण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे यांनी हा दिवस सर्व धर्म आणि समुदायातील लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, शांती, सदभावना आणि सहभावना यांना प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित आहे. तसेच हा दिवस भारताला विविधतेतील एकतेच्या मूळ मूल्याची आठवण करून देतो आणि नागरिकांना राष्ट्राच्या अधिक चांगल्यासाठी विसंगतींवर मात करण्यास प्रोत्साहित करतो. जग वाढत असलेल्या विभाजनांना तोंड देत असताना, सद्भावनाचा संदेश अधिक प्रासंगिक बनतो. तो आपल्याला संवादाद्वारे संघर्ष सोडवण्यास, प्रत्येक समुदायाचा आदर करण्यास आणि आपल्या दैनंदिन जीवनात सहिष्णुतेचे आचरण करण्यास शिकवतो असेही प्रा. धुर्वे म्हणाले. याप्रसंगी सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सुमित वासनिक आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भटके विमुक्त दिवस साजरा





**दि. ३१ ऑगस्ट, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या जुलै महिन्यातील शासन निर्णयानुसार ३१ ऑगस्ट हा दिवस भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा झालेली होती. त्याअनुषंगाने पहिला भटके विमुक्त दिवस महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धुर्वे यांनी सांगितले कि, स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या भटके विमुक्त समाजातील स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन करण्याचा हा दिवस आहे. तसेच हिंदू समाजात फूट पाडण्यासाठी १८७१ मध्ये ब्रिटिश सरकारने 'क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट' अंतर्गत काही जातींना गुन्हेगार म्हणून घोषित केले. यामुळे या समाजातील बांधवांना स्वातंत्र्यपूर्व काळात अमानुष अत्याचार सहन करावा लागला. स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी हा कायदा रद्द करण्यात आला. भटके विमुक्त समाजाचे महाराष्ट्र आणि राष्ट्रउभारणीतील योगदान लक्षात घेऊन, त्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र सरकारने २०२५ पासून ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्रा. धुर्वे म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सागर बंड यांनी केले.

### पुरस्कार

## धुळे येथील बाजरी संशोधन केंद्र उत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानीत

**दि. १९ ऑगस्ट, २०२५.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली या ठिकाणी मंडोर, जोधपुर, राजस्थान येथील अखिल भारतीय समन्वित बाजरी संशोधन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक तसेच हैदराबाद येथील राष्ट्रीय तृणधान्य संशोधन संस्थेचे निदेशक डॉ. सी.तारा सत्यवती यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय स्तरावरील ६० वी बाजरी संशोधन आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. एम. एल. जाट व पीक विज्ञान विभागाचे

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

ऑगस्ट २०२५






उपमहासंचालक डॉ. डी. के. यादव हे होते. या बैठकीच्या उपाध्यक्षस्थानी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील सहाय्यक महासंचालक डॉ. एस. के. प्रधान हे होते. या आढावा बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे येथील अखिल भारतीय समन्वित बाजरी संशोधन केंद्राला सन २०२४ – २५ या वर्षासाठी उत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने गौरविण्यात आले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि महाविद्यालय, धुळे येथे अखिल भारतीय समन्वित बाजरी संशोधन केंद्र कार्यरत आहे. या संशोधन केंद्रावर अखिल भारतीय स्तरावरील बाजरी पैदासशास्त्र, बाजरी कृषिविद्या आणि बाजरी वनस्पती विकृतीशास्त्र या विषयावरील संशोधनाचे काम करण्यात येते. या संशोधन केंद्राचे प्रमुख तसेच बाजरी पैदासकार डॉ. के. के. बऱ्हाटे, कृषिविद्या विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. आर. टी. सूर्यवंशी, वनस्पती विकृतीशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सी. एस. ठाकरे या संशोधन केंद्रात कार्यरत आहेत. संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ तसेच कर्मचाऱ्यांनी सन २०२४–२५ या वर्षात विविध प्रकारचे संशोधन प्रयोग, संशोधित केलेले विविध वाण, आदिवासी शेतकऱ्यांसाठी आदिवासी उपयोजना व शेतकऱ्यांच्या शेतावर प्रथम आद्यरेखा प्रात्यक्षिके राबविण्यात आली. या उल्लेखनीय संशोधन कार्याबद्दल या संशोधन केंद्राला उत्कृष्ट संशोधन केंद्र या पुरस्काराने गौरविण्यात आले.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाने तयार केलेल्या कृषी यंत्रांना मिळाले पेटंट





**दि. २० ऑगस्ट, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत अखिल भारतीय समन्वित कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पामध्ये संशोधित केलेल्या विद्युत मोटरचलित भुईमूग शेंगा तोडणी यंत्र व ट्रॅक्टरचलित फळबाग तण कापणी यंत्र या दोन यंत्रांना भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने पेटंट प्रदान केले आहे. या दोन यंत्रांच्या






संशोधनात महत्वाचे योगदान देणारे अखिल भारतीय समन्वित कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुलसीदास बास्टेवाड तसेच त्यांचे सहकारी डॉ. रवीकिरण राठोड, डॉ. संजय भांगरे, इंजि. गोविंद काळे यांचे नांव पेटंट प्रमाणपत्रावर नमुद करण्यात आले आहे. सदरचे पेटंट मिळविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रकाशक : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

प्रमुख संपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

सहसंपादक : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

डिझाईनर : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७९८/२०२५**